श्रीमती नीला कृष्ण जोशी यांनी लिहिलेले एकूण ११ अद्यायात छोटयाश्या स्वरूपातील ओवी बद्ध चरित्र.

# — प्रथमोध्याय —

ओम नमोजी गणनायका । वरदमूर्त ये विनायका । सेवा करूनी घ्यावी आता । एकदंता गणेशा ।।१।।

वाडीगाव श्रीदत्तांचे । कृष्णाकाठी वसे साचे । मनोहर पादुकांचे । तीर्थ स्थान सुंदर ।।२।।

अशा पवित्र स्थानी । जन्म झाला पुण्याईनी । बाळपणीचा काळ गेला । श्री दत्तात्रेय कवीश्वरांचा ।।३।।

पंजोबा दाजी दीक्षित । वास होता वाडीत । गणेश दत्त उपासना नित्य । करीत होते निरंतर ।।४।।

प्रसन्न झाले दैवत । श्री गणेश आले गृहात । मूर्ती रूपे प्रसाद । प्राप्त झाला दाजींना ।।५।।

त्याच्या कृपे भगवद्भक्त । जन्मा आले पाठोपाठ । वंशदीप उजळीत सात पिढ्या जाहल्या ।।६।।

आजोबा वक्रतुंड । मानीत दत्तात्रय आपला पुत्र । नारायणस्वामी मठात सेवा चाले अखंड ।।७।।

आजोबा वक्रतुंड । आजी सावित्रीबाई । पोटीपुत्र संतान नाही। म्हणूनी मनी दु:खित ।।८।।

श्री गोविंद स्वामी चरणी । दोघांनी हट्ट धरता । दिला दत्तूबाळ हाता । तुमचा पुत्र असेहा ।।९।।

मूर्ती पाहूनी आनंद झाला । आता चिंता कशाला । दत्तासारखा पुत्र लाभला । गुरुकृपा समर्थ ।।१०।।

प्रदक्षिणा सेवा दत्तांची । पहाटे चालू आजींची । संख्या पाच शतकांची चालू होती अखंडित ॥११॥

श्री दत्त झाले प्रसन्न । पुत्र दिला भदवद्भक्त । धुंडीराज गणेशदत्त । कृपा पात्र संतान ॥१२॥

धुंडीराज दत्तुबाळ । वाढविती समान । मौजी बंधन कौतुकात करीत दत्तुबाळाचे ॥१३॥

भांड्यावरती नांव घालती । आपणाबरोबर प्रवासा नेती । जराही त्याने न विसंबवी । लळा लागला दत्ताचा ॥१४॥

आजही त्यांच्या देवघरात । राहे अगदी आनंदात । रक्षित आहे कविश्वरास । भक्ति सोहळा अनुपम ॥१५॥

धुंडिराजांचा । शास्त्राभ्यास पुरा होता । पिताजींनी वाडीस पाचारिता । झाली सुरू पुराणसेवा । उत्सवमूर्ती सन्नीध ॥१६॥

योग्य वेळी शुभविवाह । सरस्वतीबाई पत्नीचे नांव । सुरु झाला गृहस्थाश्रम । परी तो प्रारब्धा धीन ॥१७॥

होत नाही संतान । मनी झाले उदासीन । गेले श्री वासुदेवा शरण तपाचरण झाले सुरु ॥१८॥

स्वामी वासुदेवांची झाली कृपा । करविले अनुष्ठाना । पुत्र प्राप्तीची कामना । सुफल केली दत्तांनी ॥१९॥

झाला पुत्र भगवद्भक्त । कुलदीपक वंशात । दत्तात्रयनामे ख्यात प्रसिद्ध विद्या वाचस्पती ॥२०॥

शैशव बाल्य वाडी ग्रामी । व्रतबंधन औदुंबर छायी । विवाह ही येथे होई । पत्नी सुंदर लाभली ॥२१॥

इति श्री दत्तचरित्रे उज्वल परंपरा कथन नाम

॥ प्रथमोध्याय श्रीचरणी समाप्त ॥

# – द्वितीयोध्याय –

पुढील शिक्षण धारवाडात । झाले संस्कृत पाठशाळेत । उप्पेन बेटीगिरी गुरुसमवेत । पूर्ण पारंगत जाहले ।।१।।

आजोबा वक्रतुंड । आले पुन्हा घेऊनी अवतार । वदती स्वामी वासुदेव । आनंद ऐकून जाहला ।।२।।

श्री दिक्षित स्वामी पुढे भेटले । श्रीमद् भागवत करी दिले । संहिता वाचन मनन केले । तेची झाले बहुत तप।।३।।

सहस्त्रांनी सप्ताह झाले । श्रीकृष्णगुणीमन वेधले । भगवदाकार चित्त झाले । देह भाव हा विसरून ।।४।।

पुण्य नगरी झाला वास । घडला पू. गुळवणी महाराजांचा सहवास । गुरु शिष्याचा एकांत । आत्म बोधामृत मिळाले ।।५।।

स्वामी ग्रंथ पुर्नमुद्रण । संस्कृत साहित्य संपन्न । गुरुमहाराजांनी प्रेरीत करून । झाली सेवा निष्काम ।।६।।

टिळक विद्या पिठात । शिकविले शास्त्र-तत्वज्ञान । शास्त्राजींची कीर्ती वर्धीत झाले विद्या वाचस्पती ।।७।।

आचार्यांनी केले कौतुक । सुवर्णकंकण देऊन । राष्ट्रपतींनी केला गौरव तीन वेळा यथार्थ ।।८।।

चाले गृहस्थाश्रम शास्त्रा धारे । आई साथ देती सर्व तऱ्हे । मुलामुलींनी वृक्ष बहरे । ईश्वरावर सर्वभार ।।९।।

शांत वृत्ती महाराजांची । सहनशीलता परमावधीची । कर्मकुशलता योगयुक्ती ची हीच दैवी संपत्ती ।।१०।।

असती सदा प्रसन्न चित्त । परदु:खाची जाणीव नित्य । करिती जीवा दु:खमुक्त देवूनी समजूत परमार्थाची ।।११।।

स्वावलंबन, साधीराहणी । तप्तर असती गुण गौरवी । परदोषना दिसती । तया कधीही कोणाचे ।।१२।।

परदोष कंठी ठेवावे । कधी कुणा न दर्शवावे । वीष कंठी करूनी धारण । शिकविले हेच महेशांनी ॥१३॥

कॉफीत नव्हती साखर । नाही केली तक्रार । मुलींचे आले लक्षात । आई साखर विसरली ॥१४॥

विचारले जेव्हा तयासी । म्हणती होते असे कधी । एखादेवेळी झाले म्हणूनी तक्रार का करावी ॥१५॥

अजित होता लहान । शिकवणीस आले शिष्यगण । चाले त्याची लुडबूड । शांत चित्ते वदती तया ॥१६॥

थोडा वेळ गडबड करू नका । आत जाहो खेळायाला । मग घेऊ तुम्हाला । तोवरी दम धरा ॥१७॥

स्वर कधी न चढवून । बोलणे चाले सहजतेने । अंतरात देवा सन्नीध । मन रंगून गेलेले ॥१८॥

वामनरावजींची कृपादृष्टी । सतत वर्षली महाराजांवरी । चिंता सर्व परिवाराची घेती गुरुदेव आस्थेने ॥१९॥

रोज जाती त्यांच्या घरी । चार जिन्यांची नाही क्षिती । 'लक्ष्मी' कशी आहेस विचारिती । अशी चौकशी रोज असे ॥२०॥

दत्त महाराज आश्रमात । रोज करिती अनुष्ठान । वाट पाहती गुरुदेव कधी येती म्हणूनी ॥२१॥

पायी चपला कधी नसती । घाईगर्दी कामाची । गुरुदेव मनी कळवळती दूध फळे त्वरे द्या ॥२२॥

ऐसी कळवळ्याची जाती । करी तयावरी अखंड प्रिती ।
ठेवूनी चरणी माझी मती । अध्याय येथे संपविते ।

*इतिश्री दत्तचरित्रे गुरुभेट गृहस्थाश्रमवर्णन नाम द्वितीयोध्याय:*

# - तृतीयोध्याय -

श्रीगुरुमहाराजांना करूनी वंदन । प्रथम तयांचे पुण्यस्मरण । नवअध्यया आरंभ करून । वर्णन शांती सोहळ्याचे ॥१॥

गुरुरायांनी कौतुक केले । साठी शांतीचे आयोजन केले । पिताश्रींना आमंत्रिले घेतले स.प. सभागृह ॥२॥

सर्व यथासांग केले। मातोश्री नव्हत्या त्यावेळे । न्यून काही न ठेविले । बोलले सभेत आशिर्वच ॥३॥

पुढील मम कार्याची धुरा । आहे आपणावरी सर्वथा । ऐसे शब्द उच्चारता । मंत्र मुग्ध झाली सभा ॥४॥

गुरुमहाराजांचे जीवन उज्वल । गुरुभक्तीचे तयास भूषण । सारे कर्म असे समर्पण । श्वासे श्वासे गुरूस्मरण ॥५॥

गुरुमहाराजांचा निवास । वीस नारायण पेठ । दोन खोल्यात वास । चाळीसवर्षे घडली तेथ । उपासना ॥६॥

नको म्हणती मठ आश्रम । उगाच वाढवू नये व्याप । दूर असती प्रसिद्धी पासून । असूनी योग चूडामणी ॥७॥

श्री दत्तमहाराजांचे होते मनात । आता न रहावे चाळीत । कुलदेवता पादुकांसहित असावे स्थान व्यवस्थित ॥८॥

एकाएकी पानशेत धरण फुटले । सर्व पुणे हादरून गेले । चाळीत ही पाणी भरले गोवईकरांच्या ॥९॥

देव्हारा पाण्याखाली गेला । पाण्याचा प्रचंड लोंढा आला । सिद्धमाता मंदिरात नेले गुरुमहाराजांना ॥१०॥

रात्री देव शोधी पर्यंत । पाणी नाही घेतले मुखात । ध्यानस्थ होऊनी राहत । देव न मिळाल्यास जीवनांत घडेल ॥११॥

भक्तांनी खूप प्रयत्न केले । रात्री जावून देव शोधले । पोथी पादुकांसह सर्व सापडले । गुरुदेव तोषले मनात ॥१२॥

प्रसाद पादुका देवीभवानी । नीट करावी स्थापन । त्यांचे पूजन अर्चन व्यवस्थित घडले पाहिजे ॥१३॥

ही संधी साधून । श्री दत्तमहाराजांनी केला प्रश्न । आता संमती द्यावी आश्रमास । सोय होईल देवांची ॥१४॥

अनुमती मिळाली गुरुदेवांकडून । परंतु एक अट घालून । माझ्या गुरुंचा केवळ निवास । माझे काही नको तेथे ॥१५॥

श्री दत्तमहाराजांचा असे सत्यसंकल्प । तत्काळ असे सिद्धीतेथ । झाला श्रीगुरुवासुदेव निवास। अध्यात्म आधार सकळ जनास ॥१६॥

देव झाले स्थानापन्न । सुरु झाले पवमानरुद्र अनुष्ठान । ब्राह्ममुहूर्ती साधन । साधक येऊ लागले ॥१७॥

देवकार्या गती आली । शक्तीपाताची सरिता वाहिली । अध्यात्माची उषा उजळली । सान थोर वृद्धांना ॥१८॥

सहस्त्रदर्शन रौद्री शांती । उत्सव तसे महोत्सव होती । सन्यांसी योगीयती येती । पावन झाला निवास ॥१९॥

भागवत सप्ताह कथा कीर्तन । वेदांचे स्वर मंत्राचा गजर । शंकराचार्यांचे होई पुजन । यज्ञयाग अनुष्ठाने पर्वणी ॥२०॥

वाडी घाटाचे काम संपूर्ण । केले देवचरणी अर्पण सारे दत्तमहाराजांचे करी सोपवून । संतोष पावले वामनगुरु ॥२१॥

दत्त महाराज प्रधान विश्वस्त । प्रेम नम्रतेने परीपूर्ण । गुरुंचे पूर्ण प्रतिबिंब । एकरूप होऊन चालविती कार्य सेवाभावे ॥२१॥

*इति श्री श्रीदत्त चरित्रे वासुदेव निवास स्थापन नाम तृतियोध्याय:*

# – चतुर्थोध्याय –

हात जोडूनी गुरुदेवांना । वाडीच्या या पादुकांना । लेखन स्फूर्ती द्यावी प्रार्थना । अल्पमती मी चरित्रगाना ।।१।।

गुरुदेवांचे झाले निर्याण । पोकळी झाली निर्माण । परी गुरुवचनी एकनिष्ठ राहून कार्यरती निमग्न झाले ।।२।।

गुरुइच्छेप्रमाण चालविला आश्रम । केले सर्वस्व अर्पण । गुरुंचेही काही स्मरण वामन निवास उभारिला ।।३।।

भागवत सप्ताह केले अनेक । भगवंताला मारिली हाक । सहाय्यास आले वैकूंठनायक तनामनासहित धन । सेवाकार्यी वाहिले ।।४।।

काही व्हावी रूग्णसेवा । माताभगिनीना लाभ व्हावा । उघडिले आरोग्यधामा शुल्क अल्प ठेवून ।।५।।

लोकनाथ स्वामींचे आद्यनाम । तुळजाभवानी आरोग्यधाम । वासुदेव लोकनाथ पुण्यस्मरण । दत्तमहाराजांनी साधिले ।।६।।

शक्तीपात दिक्षेची मूहुर्त मेढ । अचानक लोकनाथांची गुरुभेट । वामनरावांचा शोध घेत । आले स्वामी महाराष्ट्री ।।७।।

पुण्यात आद्यशक्तिपीठ । वामनरावजींचे गवसले थोरपण । लोकनाथयती संतुष्ट वामनयोगी देखून ।।८।।

लोकनाथ होते यती संन्यासी । असती थोर महायोगी । आणिली कावडगंगेची शक्तिपात दिक्षेची ।।९।।

श्री लोकनाथांचा सहवास । श्री गुरुंना लाभला खास । बुद्धी तेज शुद्ध मानस ओळखिले यतींनी अंतरी ।।१०।।

असे हे योग निधान । त्यांनी केले योगदान । त्यांचे चरणी कृतज्ञ राहून पावननामे आरोग्यधआम काढिले ।।११।।

ते गुरूकृपा पात्र डॉक्टर । मानवी बाईवर सोपवून भार । भरू देवून सेवेवर योगवर्ग सुरू केले ।।१२।।

औरवाड वाडी समोर । तेथे प्राचीन दत्तअमरेश्वर । दीक्षित स्वामींचे देवघर । केला जीर्णोद्धार महाराजांनी ।।१३।।

काम झाले दिव्य भव्य । कृष्णाबाईला घाट बांधून । सोय केली परीपूर्ण । भागवत सप्ताह सुरु केला ॥१४॥

देऊळ गावी समाधी मंदिर । मातोश्रींचे तुळसी वृंदावन । शंकराचार्य पाठशाळा । जीर्णोद्धार करून। केले समर्पण गुरुदेवांच्या चरणी ॥१५॥

आईरेणुकेचा सोहळा करिती भक्तीने । नवरात्री उत्सव हा साग्रसंगीत श्रद्धेने । रंगुनी जाती भजनपुजने । दत्तमहाराज ध्यान मग्न ॥१६॥

अंतरात अखंडनाम । नाही कधी आराम । झाले सदा पूर्ण काम करीती कर्म निष्काम ॥१७॥

देवभावाचा भुकेला । भक्ती प्रेमाने जोडावा । स्मरणत्याचे अंतरात । सदोदित जागे ठेवा ॥१८॥

उपदेशाचे असे सार । करावा नीट संसार । भार घालूनी देवावर । विवेक विचारे ॥१९॥

आल्या भोगा त्रासू नये । स्वकर्तव्या टाळू नये । कोणा दूषण देऊ नये । आळस नसावा प्रयत्नांत ॥२०॥

भाव सुमने दुर्वांदळ । वाहते गुरुचरणावर । चौथा अध्याय झाला पूर्ण गुरुचरणी अर्पिते ।

*इति श्री दत्तचरित्रे महत्कार्य कथन नाम चतुर्थोध्याय:*

## – पंचमोध्याय –

माघ चतुर्थी विनायकी २०००

ओंकार स्वरूपी श्रीगुरुदेवा । स्फूर्तीरूपे आशीष द्यावा । अलक्षी लक्ष असू द्यावा । अशी विनंती पदी या ॥१॥

दत्तमहाराजांचा अमृतमहोत्सव । सर्वांगपरिपूर्ण सहस्त्रचंद्रदर्शन । रौद्र शांती देऊळगावांत भक्ती सागर उचंबळला ॥२॥

आले काशीचे विद्वत्जन । गुरुजन आले धारवाडातून । थोर पंडीत पुण्यामुंबईतून दत्त दरबार हा भरला ।।३।।

यज्ञ याग पुजा विधान । ऐंशी कुमारिकांचे पूजन । शास्त्रोत्क झाले कुंकुमार्चन । अनेक ग्रंथ सप्ताह पूर्ण । कथा कीर्तन प्रवचन ।।४।।

चारीवेदांचे झाले पठण । अनेक प्रकारचे हवन । मंत्रशास्त्रविद्याजाण अग्नीपूजन नामस्मरण ।।५।।

सवत्स धेनूसह गोप्रदान । तसेच रजक तुला दान । पारणे नी अन्नदान भस्मे भूषणे दक्षिणा प्रदान । तृप्त झाले द्विजगण ।।६।।

देऊळगावी रौद्रशांती । भक्ती श्रद्धेची अपरिमीतशक्ती । आजोबा वक्रतुंडशास्त्री यांची ख्याती सर्वत्र ।।७।।

मातृपितृभक्त धुंडीराज़ । त्यांचे येथे समाधी स्थान । बालाजीचे देवस्थान । कृपाछत्र कुळावर ।।८।।

येथी ही झाले यज्ञयाग । हवन झाले यथासांग । तुला भक्तीची लागे शीग । तुलना अशक्य या तुलेची ।।९।।

ऐश्वर्य योग हा गुरूकृपेचा । गणेशदत्तरेणुकेचा । आजोबा पंजोबा सकलांचा । तुळजाभवानी पाठीशी ।।१०।।

सर्व गौरवा ताई असती । भगिनी प्रेमाची शाल घेऊन हाती । नेत्री प्रेमाश्रू ओघळती । बघुनी सोहळा अपूर्व ।।११।।

गुरुदेव धुंडीराज गुरुमातासरस्वती । यांची होई ताईंना स्मृती । म्हणती भाग्यवान किती । सुपुत्र लाभे किर्तीवंत ।।१२।।

पुढे उत्सव होई जालन्याला । भक्ती प्रेमाचा सुकाळू झाला । जलकलश घेऊनी । नारी आल्या स्वागता ।।१३।।

वाद्ये गर्जती अपार । श्रीदत्त श्रीदत्त घुमला स्वर सौ. ताईचे देहभान पूर्णपणे हारपले ।।१४।।

किती नी कसे करू स्वागत । असे ताईंचे मनोगत । चैतन्य फुलले सर्वगत शब्द काही फुटेना ॥१५॥

वास्तव्य झाले दत्ताश्रमात । आनंद फुलला घरात सर्वत्र मोद बरसत । कृपा मेघ वोळला ॥१६॥

ताईंचे पिताजी रामभक्त । प्रेमळ, अधिकारी थोर संत ताईंना देऊनी परमार्थ धन । भक्तीमार्ग दाविला ॥१७॥

गुरु धुंडीराजशास्त्री । गणेश दत्तभक्त । संसार संभाळूनी परमार्थ ताईंनी जीवनी केला सार्थ ॥१८॥

रामनवमी जन्मसोहळा । जमला सारा भक्तमेळा । तोच जन्मदिन ताईंचा महाराजांनी केला साजरा ॥१९॥

आईसाहेबांनी केला थाट । भोजन पक्वान्ने चांदीचे ताट । पैठणी मऊमायेची जरतारी पैठणची । माहेरची घेतली ॥२०॥

ओटीत घालूनी श्रीफळ । मणीमंगळसूत्राचे सौभाग्यवायन । भरली हिरवी कंकण, नंणदेच्या पाठीवरून हात फिरविला मायेचा ॥२१॥

असा हा गुरुपरिवार । वंदिते तयांना वारंवार । एकवीसदुर्वांचे तृणांकूर गुरुवामन चरणावर । वाहूनी नत मस्तक झाले ॥२१॥

*इतिश्री श्री दत्तचरित्रे गौरवसमारंभ पूजननाम पंचमोध्याय:*

# - षष्ठोध्याय -

प्रथमचरणी गुरुवंदन । त्यांच्या प्रेरणेवाचून । न सुचे शब्द लेखन । स्मरण तयांचे मनापासून । तुलसीपत्र वाहते ॥१॥

आईसाहेब असती हौशी । आल्या गेल्याचे सदा करिती । प्रदक्षिणाव्रत नित्य आचरती । कष्ट केले बहुत ॥२॥

लहान जागा जीने तीन । पाणी भरावे लागे खालून । सारे केले हसतमुखाने आळस कंटाळा त्या नाही ॥३॥

दत्त महाराज गंभीर प्रकृतीचे । लेखन वाचन नित्य तयांचे । विवेक वैराग्य अंगी बाणे तयांच्या ॥४॥

मुले लहान काम घरात । सर्व वेळ जाई त्यात । त्यान मिळे कधी फुरसत । सेवाव्रत घेतले ॥५॥

विवाह झाला वाडीत । म्हणूनी वाडीचे तया प्रेम । प्रदक्षिणेचा नित्य नेम । तेथे चाले अखंड ॥६॥

कृष्णाबाईत प्रात:स्नान । करुनी पादुकादर्शन । पाणी आणिती नदीवरून हाती कळशा भरून ॥७॥

त्यांची सहस्त्र दर्शन शांती । आश्रमात झाली औदुंबरा खालती । स्वत: दत्तमहाराज लक्ष घालती । करूनी योग्य सन्मान ॥८॥

त्या दोघांना वंदन । आदरभाव ठेवून पदी नम्र होऊन । नतमस्तक होऊन्या ॥९॥

नारायण स्वामींचे उत्सवास । दत्तमहाराज वाडीत दहा दिवस । पुराणकथा प्रवचन । नित्यसेवा घडतसे ॥१०॥

वाडीत त्यांना शांत वाटे । चित्ती प्रसन्नता दाटे । वृत्ती आत्मरंगी निटे । पावती तादात्म्य गुरुचरणी ॥११।

कृष्णाबाईत होता स्नात । लाभे तयांना एकांत । नृसिंहसरस्वती स्वामी भेटूनी । विराले द्वैत ॥१२॥

औखाडी देव घरात । दीक्षित स्वामी वसती जेथ । तेथे बसती निवांत । गुरुचरणरत ध्यानस्थ ॥१३॥

यावयाचे येथे मनात । करीन श्रवण सेवाव्रत । आपली आज्ञा परी न जमत मनी येई बहू खिन्नता ॥१४॥

पुढे केला मंदिराचा जीर्णोद्धार । मनी हर्ष झाला अपार । आता जाऊ राहूनी शांत । परी थकले शरीर ॥१५॥

होते सदा नित्य तृप्त । तसेच होते आत्मरत । झाले जीवन कृतार्थ । एकरूप ॥१६॥

सर्व शास्त्रांचा पूर्ण अभ्यास । लागला भक्तीचा ध्यास । अनाहत नादाचा घोष । कर्णी एकू येतसे ॥१७॥

हातूनी घडले निष्काम कर्म । संसार झाला परी पूर्ण । आत्मपदी निमग्न । झाले दत्तमहाराज ॥१८॥

अवलोकावे त्यांचे जीवन । मनात घ्यावे ठसवून । स्वता जीवनी काही अनुसरून । त्यांचे स्मरण ठेवावे ॥१९॥

अगदी साधे विनीत जीवन । जगा धाकुटे ही शिकवण । घेतली अंतरी बाणवून श्री ज्ञानराजांची ॥२०॥

पू. गुरुमहाराजांचे चरणी विनवणी । ईशभक्ती दृढ करूनी । भक्ती दुर्वांकूर गोड करूनी । प्रेरणा बुद्धीला मिळावी ॥२१॥

*इतिश्री श्री दत्तचरित्रे आत्मस्थित वर्णन नाम षष्ठोध्याय:*

# – सप्तमोध्याय –

प्रथमारंभी गुरूमूर्ती । सुर्यापरी प्रकाशती । चरित्र लेखना गती द्यावी । तशीच द्यावी मज स्फूर्ती ॥१॥

आश्रमावरी अती प्रीति । रोज आश्रमात जाती । दर्शनास लोक येती । तयापाशी सुखदु:ख सांगती ॥२॥

अती मृदु सरळ स्वभाव । सदैव दुसऱ्याची जाणीव । करिती चौकशी आपुलकीने योग्य वच ते बोलती ॥३॥

अतिशय शांत असती । मनाचे संतुलन सांधिती । दुसऱ्याचे पूर्ण ऐकूनी घेती ईशसेवेचा मार्ग सांगती ॥४॥

चित्तशुद्ध झाल्यामुळे । द्वैत सारे मावळे । शब्द जणू मंत्र झाले । संकल्प सिद्धीला गेले । मीपण त्यांचे गळाले ॥५॥

पूर्ण बुद्धी तयांची होती । तेथे देवाची वसती । व्यवहार कुशल निपुण नीती । अवडंबर ना कसले ॥६॥

प्रवचनात चित्तवृत्ती । निरूपणाशीतद्रूप होती । श्रद्धा भक्ती गुरूपदी । हरीपरायण अंतरी ॥७॥

देव जवळी अंतरी । देव असे चराचरी । द्रौपदी निश्चये हाकारी । तत्क्षणी वस्त्ररूप झाला हरी ॥८॥

देव जवळी यावा । असे वाटत असेल जीवा । भक्तीने तया आळवावा । दृढ विश्वास ठेवावा ॥९॥

दिगंबरा हा महामंत्र । म्हणावा दिनरात । तोच आहे अंतरात ठसवून घ्यावे मनी ऐसे ॥१०॥

विशाल बुद्धी द्रौपदीची । मारू नका अश्वथाम्यासी । सांगे कळवळून पांडवासी । दु:ख देऊ नका । गुरूमातेसी ॥११॥

द्रौपदी महान सती । दत्तमहाराज पुन्हा पुन्हा सांगती । हे त्यांचे बोलचित्ती आपण मनी ठेवूया ॥१२॥

नियमात असावे सातत्य । नसावे त्यात अस्थिर चित्त । दृढ निश्चय परमार्थात । कर्तव्याचरण करीत जावे ॥१३॥

सांगती उदाहरण सुमती मातेचे । साक्षात दत्त भिक्षूवेषे आले त्याचे । म्हणती भिक्षा वाढ माते । क्षणात मिष्टान्न वाढले ॥१४॥

तिचा नियम होता । अतिथी विन्मुख कधी न गेला । आज परिक्षेचा क्षण आला श्राद्ध होते घरात ॥१५॥

निश्चयात्मक बुद्धी होती । अतिथी देव मानीत होती । करीन पुन्हा पाक निष्पत्ती याची तिला प्रचिती । स्वयेदत्तात्रय गृहा आले ॥१६॥

संतुष्ट झाले श्रीदत्त । आई वर माग म्हणत । आई शब्द त्यांचे मुखातून ऐकून म्हणे धन्य झाले ॥१७॥

सुपुत्र व्हावा तुम्हापरी । ऐसी इच्छा अंतरी । श्रीपाद रुपे श्रीदत्तात्रय । गणेश चतुर्थीला अवतरले ॥१८॥

दत्तमहाराज सांगती । ऐसी माताभगिनींची महती । अन्नदानाचे पुण्यअंती आले श्रीपाद श्रीवल्लभ यती । पुत्ररुपाने त्याघरी ॥१९॥

या उपदेशाची आठवण । करूया तसे आचरण । हेच खरे पुण्यस्मरण सगळे मिळून करूया ॥२०॥

गुरुचरण भागिरथी । तयापाशी शुद्धमती । सप्ताध्याय अर्पूनी प्रीति । अखंड असू द्यावी स्फुर्ती । विनंती ऐशी परियेसा ॥२१॥

*इतिश्री श्री दत्तचरित्रे मातांमहात्म्य कथन नाम सप्तमोध्याय :*

# – अष्टमोध्याय –

श्रीगुरुंच्या पदी वंदन । भागवताचे करूनी स्मरण । हरीमय व्हावे माझे जीवन ऐसी इच्छा पुरवावी ।।१।।

भागवताची पारायणे । अनंत झाली दत्तमुखाने । हरीरूप दिसे चोहीकडे । जीवन झाले हरीमय ।।२।।

सकाळी संहिता वाचन । गती येई विलक्षण । दुपारी संपूर्ण निरुपण । सविस्तर सांगती ।।३।।

कुठलाही भाग न गाळिता । सांगती सर्व भागवत कथा । योग्य ठिकाणी सुलभता अर्थ सांगती रसाळ ।।४।।

इकडचे तिकडचे न बोलती वाचे । निरूपण समग्र ग्रंथाचे । वेळ किती याचे भान नसे ।।५।।

विनोद बुद्धी असून । उगीच ना केले लोकरंजन । टिका न करती कुणावर । अर्थ गंगौघा परी वहातसे ।।६।।

नमोस्तुते नारायणी । प्रवचन श्री युक्तावरी । एकाग्र मन ग्रंथावरी । देहभान विसरती ।।७।।

त्यांचे मुखी सरस्वती । म्हणुनी विद्यावाचस्पती । श्रवणातुनी चित्तशुद्धी श्रोतयांची होतसे ।।८।।

गुरुमहाराजांची इच्छा होती । स्वतः श्रवणास बसती । श्रीदत्तमहाराजांवरी अती प्रीति । कृपादृष्टी सदैव ।।९।।

संशोधन वृत्ती होती । पारिजात सौरभ ग्रंथ निर्मिती । न्याय मिमांसा शिकविती टिळक विद्यापिठात ।।१०।।

कौशिक व्याख्यानमालेत । दत्तात्रय योगिया ज्ञानेश्वर । दिसते तेथे बुद्धीचे खोलपण । विस्मित मन होते ।।११।।

विद्वान पंडीत असून । भक्तीत रमले त्यांचे मन । सर्वांना निकट झाले म्हणून संत लाभले ॥१२॥

अंतरी स्वस्वरूपाप्रत । परी लोकसेवाव्रत । चंदनापरी देह झिजवीत । देहभाव ना उरला ॥१३॥

उरलो उपकारापुरता । तुकोबांपरी झाली अवस्था । कुणी निंदा कुणी वंदा । साम्यावस्था । साधली ॥१४॥

अनेक गौरव सोहळे । भव्य दिव्य उत्सव झाले । अमानित्व अंगी बाणले । कतृत्व म्हणती देवाचे ॥१५॥

अनेक मूर्तींची स्थापना । नाना साहित्य प्रकाशन । अनेक उद्घाटने पवित्र हस्ते जाहली ॥१६॥

दरवर्षी आमचे घरी येणे झाले । एकादशीला जणू पांडुरंग आले। द्वादशीला पारणे झाले । त्रयोदशीला उदक शांत ॥१७॥

खूप आनंदी आनंद होई । गृहाचे मंदीर होई । गुरूपौर्णिमेला आरंभ करूनी । परत जाती पुण्याला ॥१८॥

किती तरी केले आमच्यासाठी । मोजमापना त्याची गणती । अहेतुक प्रीति आमच्यावरती । ठेविते मस्तकचरणा वरती ॥१९॥

हात जोडिते बहु प्रेमाने । आपल्या ऋणात सदैव रहाणे । कृतज्ञता ही मनी ठेवणे । हाती उरले हे एक ॥२०॥

असा आशिर्वाद असावा । कधी न पडो विसर आपला । सर्वांवरती पूर्ण कृपा ठेवा गृही निरंतर ॥२१॥

*इतिश्री श्री दत्तचरित्रे विविधकार्य कथन नाम अष्टमोध्यायः*

# – नवमोध्याय –

श्रीगुरु पाठीराखे असती । अश्रद्ध असावे चित्ती । मनात असावी गुरुभक्ती तीच तारिते जीवाला ॥१॥

संसार सर्व फळला । आधारवट झाला । नातवंडापतवंडानी बहरला । कृपा प्रसादे देवाचा ॥२॥

सौ. आईसाहेबांची काया थकली । मधुमेहाची व्यथा जडली । औषध पाणी त्वरीत देऊनी । करीती योग्य उपाय ॥३॥

भोग भोगूनी संपवावा । कुरकुर कंटाळा नसावा । देवावरी भार घालावा । सांगणे होते महाराजांचे ॥४॥

हसून खेळून भोग भोगिती । जपमाळ होती सतत हाती । आल्यागेल्यांची चौकशी करिती । म्हणती काही खाऊन जा ॥५॥

कुंकू भाळी ठसठशीत । हाती कंकणे घसघशीत । लुगडेभरजरी शोभत । ऐश्वर्य होते देवाचे ॥६॥

दत्तमहाराजांच्या संगतीत । काळ सरला सत्संगात । उदया आले सुकृत । दत्तात्रयांची सोबत लाभली ॥७॥

गुरुमहाराजांची माया । लाभली गुरुकृपेची छाया । रोज येती गुरुराया । स्वत: भेटाया गृहात ॥८॥

लक्ष्मी कशी आहेस । रोज चौकशी करीत । मुलाबाळांवरी प्रेमे होते । फिरवीती हात आपुलकीचा ॥९॥

नेहमी म्हणती सगळ्यांना । यांची विद्वता मज कळेना । परी त्यांच्या सहवासात माझे जीवन सुवर्ण झाले ॥१०॥

दत्तमहाराजांना काही होऊ लागले । यांचा जीव गलबले । जाणे आहे अहेवपणे वारंवार प्रार्थिती ॥११॥

आईंची प्रकृती थकत गेली । सहन करण्याची शक्ती मिळाली । शुश्रुषा उत्तम केली । सुनामुलांनी जीवे भावे ॥१२॥

परी होत्या समाधानी । तशा शांत पडूनी राहती । खोलीत जाती दर्शनासी । नित्य नेमे महाराजांच्या ॥१३॥

दिवसा मागून दिवस जाती । आई क्षीण क्षीण होती । पुढे महाराज रोज जाती चौकशीस आईंच्या ॥१४॥

दृष्टी पडे दत्तात्रयांची । प्रसन्नता होई चित्ताची । मूकपणे काय बोलती । कसे कळावे सामान्यासी ॥१५॥

मनाची पूर्ण तृप्ती होती । वासना काही शिल्लक नव्हती । जाण्याची तयारी होती । महाराजांच्या देखत ॥१६॥

गुरुमहाराजांची पुण्यतिथी । पार पडली व्यवस्थित । प्रसाद करूनी ग्रहण हात जोडिले गुरुदेवास । नेत्री प्रेमाश्रू भरले ॥१७॥

अष्टमी दोन दिवस होती । उत्सव गर्दी परतली होती । सायंकाळी आई अचानक सर्वांचा निरोप घेती ॥१८॥

गुरुमहाराजांची तीथ साधुनी । अहेवपण हे अंगी लेवूनी । श्रीफळ ओटी सौभाग्यवायनी । निघाल्या निजधामा ॥१९॥

दत्तमहाराजांनी सांगितले । तुम्ही आमचे सर्वपूर्ण केले । आता काही नुरले । समाधान दिले आम्हाला ॥२०॥

दत्तमहाराज थकले शरीर । येऊन वदले बाहेर । सात पाऊले टाकलीबरोबर । निरोप घेती अखेरचा ॥२१॥

*इतिश्री श्री दत्तचरित्रे आईसाहेबांचे निर्वाण कथन नाम नवमोध्याय :*

# – दशमोध्याय –

श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह सरस्वती । आपली राहो नित्यस्मृती । मानस पुजन अती प्रीति । गोड करूनी घ्यावे ॥१॥

घटना अव्यक्त असती । तोवरी नाकळती । ईश्वराची अर्तक्य शक्ती कल्पनातीत अघटीत ॥२॥

स्थित प्रज्ञता दत्तमहाराजांची । जाणून देती कोणासी । होता आईंचे निर्वाण पूर्ती झाली कर्तव्याची ॥३॥

आधीच होते अनासक्त । अनाहत ध्वनी ऐकू येत । आता झाले पूर्ण विरक्त । कामा पुरते बोलती ॥४॥

कृष्णदयार्णवांचे गीत । गोड ध्वनी कर्णी पडत । श्रीपाद श्रीवल्लभ स्तोत्र । येई परेतून ध्वनीत ॥५॥

स्वरूपी मग्न असती । देहभाव हारपती । मुखावरी कांती यातनांची क्षिती नसे ॥६॥

ताप आला झाले निमित्त । शरीर पूर्ण थकूनि जात । तरी स्नान संध्या नियमित विस्मित मन होई ॥७॥

रोज तळवलकर येती । काळजीपूर्वक तपासती । महाराज वाट पहाती । गप्पागोष्टी विनोद ॥८॥

ताप काही थांबेना । डॉक्टर करीती प्रयत्न नाना । उपाय काही चालेना सर्वांना चिंता लागली ॥९॥

बंद केले स्नान । तेथपासून वर्ज केले अन्न । स्वीकारले पूर्ण मौन । ब्रह्मानंदी रंगले ॥१०॥

प्रारब्धाधीन देह तोवरी । राहिले पूर्ण भगवद्भजनी । स्थित चित्त राहूनी इहलोकीचा संबंध । मनाने संपविला ॥११॥

आई गेल्यानंतर केली आवराआवरी । निश्चय मनी काही तरी । पन्नास दिवस बरोबरी । लौकिक देहाने राहिले ।।१२।।

चतुर्दशी सोमवार उजाडला । सूर्य नभी प्रकाशला । दत्तमहाराजांनी नमस्कार केला । जीवन सूर्य मावळला ।।१३।।

शांत झाले जीवन । तुटला देहसंबंध । कोणा खरे न वाटत । सर्व जण कळवळले ।।१४।।

सुवर्णकांती झाली होती । मुखी प्रसन्नता होती । सागरा मिळाली जीवन ज्योती । ऐक्य झाले परमात्म्याशी ।।१५।।

सर्वदूर बातमी पोचली । मंडळी गावागावाहून निघाली । दाट गर्दी पुण्यात झाली । अश्रूफुलांची राशी पडली ।।१६।।

विद्वान आले पंडीत आले । छोटे मोठे सर्व जमले । भक्तमंडळींचे थवे सदनापाशी थांबले ।।१७।।

दर्शनाची रांग लागली । अंतरी मंडळी हेलावली । असा महात्मा होणे नाही । ज्याच्या त्याच्या मुखी असे ।।१८।।

दिगंबरा दिगंबरा धुन चालली । दिगंतरा वंदन घ्यावे कवीश्वरा । असे भजन दिंडीसह निघाले । श्रीदत्तममहाराज कवीश्वरा शास्त्राधारे चाले सारे पुष्प रथावर ठेवले ।।१९।।

वासुदेव निवास झाला खिन्न । भवानीमाता उभी तिष्ठत । दोन यती द्वारी दत्त । पाहती वाट महाराजांची ।।२०।।

निवासापाशी उभा रथ । आश्रम झाला सद्‌गदीत । तुळजाभवानी फिरवी हात गुरुदेवांचा दृष्टीपात । भाग्य विधाता निघाला ।।२१।।

सर्वांवरी कृपा केली । विद्वत्ता शिगेला पोचली । विनम्रतेची सीमा झाली। अशी आमची माय माऊली वंदन तिला त्रिवार ।

*इतिश्री श्री दत्तचरित्रे श्रीदत्तमहाराज वैकुंठ गमनमनाम दशमोध्याय:*

# – एकादशोध्याय –

अशीच नमूनी श्रीगुरुमूर्ती । मनी आळवावी त्यांची स्मृती । दृढ श्रद्धा भावभक्ती विसर कधी न पडावा ।।१।।

प. पू. महाराजांचे निजधामी गमन । करी प्रत्येका शोक मग्न । गुरुचिंतनी झाले निमग्न । परमपुरुषाची मोहर अंतर लागली ।।२।।

सारा भारत हळहळला । लोकसभेत ठराव झाला । वर्तमानपत्री गौरव झाला । थोर शास्त्री म्हणूनी ।।३।।

शास्त्रे परेच निष्णात । असे होते विभुती मत्व । सांगितले विभूती योगात श्रीकृष्णाने गीतेत ।।४।।

दैवी संपत्ती पूर्ण । आपण स्मरावे विशेष गुण । प्रयत्न रत राहून । वाट चालूया मार्गाधारे ।।५।।

जरी देहाने ते नसले । विश्वात भरूनी राहिले । आर्ततेने हाकारता । समीप ते आहेत ।।६।।

निश्चय मन बुद्धीचा करून । ईश्वर दर्शन ध्येय ठेवून । त्यासाठी भगवद्भजन गुरुस्मरण अर्हनिश ।।७।।

आराध्य देवतेचे सगुण अर्चन । परी ती विश्वाकार आहे हे जाणून । काम क्रोध दूर ठेवून । सत्कर्माचे भान असावे ।।८।।

मी कर्ता असे मानू नये । तो कर्ता ही जाणीव लोपू नये । सद्गुरु आहेत परीपूर्ण । दृढभाव असा असावा ।।९।।

सौजन्याने वागावे । कटू कुणा न बोलावे । अंतरी प्रेम असावे । सेवाभाव कमी न व्हावा ।।१०।।

जिकडे तिकडे आहे देव । तयावीण रिता न ठाव । जवळी आहे अंतरात । याचा विसर न पडावा ।।११।।

लाटा असती सागरामुळे । वस्त्रे दिसती तंतूमुळे । लेणे भुषणे सोनेपणे । तैसे विश्व ईश्वरामुळे । ऐसा विचार करावा ।।१२।।

विवेकाला सोडू नये । सार असार शोधूनी घ्यावे । आसक्त अती राहू नये । संसार आनंदे करावा ।।१३।।

जे जे आले वाट्याला । त्याचा कंटाळा करू नका । गप्पात वेळ घालवू नका । कार्यात सदा रंगावे ।।१४।।

मनाचे व्यापकपण । बुद्धीचे विशालपण । यासाठी गुरुवचनी विश्वास धरून । अभ्यास चालू ठेवावा ।।१५।।

अती लोभ कधी करू नये । देण्याची सवय सोडू नये । उगीच तुटक वागू नये । असा उपदेश संतांचा ।।१६।।

ईश्वर आहे सन्निध । जेथे जावे तेथे तोच । काळजी चिंतेत उद्विग्न साधकांनी ठेवू नये ।।१७।।

प्रसंग आल्यावरी । शांत राहूनी विचार करी । भांबावून जाऊ नये कधी । ईश्वर मार्ग सुचवील ।।१८।।

यामधे आहे संसार हित । ईश्वराची सदैव सोबत । राहील मन प्रसन्नचित्त । कार्य साधेल योग्य ते ।।१९।।

मुळाधारापासून श्वासोश्वास । कोण करितो दिनरात । जठराग्नीत अन्नाचे पचन । रक्त कोण बनवितो ।।२०।।

सूर्यप्रकाश हिरव्यापर्णात । वृक्षी बनवितो कसे अन्न । उर्जाशक्ती उत्पन्न कोण सांग करितसे ।।२१।।

असे चिंतन करता करता । ईशशक्तीची चाहूल कळेल चित्ता । सद्गुरु चरणी एकाग्रता असावी ।।२२।।

प्रकृती पुरुष अनादी मेहूण । त्याने केले जग निर्माण । ही मनी धारणा धरून । वृत्ती ईश्वरा प्रती न्यावी ।।२३।।

गुरू महाराज दत्त महाराज । दोघांचे एकपण । अद्वैतपण त्यांचे जाणून । उपदेश एक मानावा ।।२४।।

असा उपदेश करीत होते । त्यांचे कृपे कथन करिते । यात मांझे काहीच नसे । सेवा अर्पण गुरुचरणी ।।२५।।

*इतिश्री श्री दत्तचरित्रे उपदेश सार कथन नाम एकादशोध्याय: संपूर्णम्।*

## – प्रार्थना –

एकादशाचे आर्वतन । जणू रूद्राचे अनुष्ठान । एकादष्णी गोड मानून । द्यावे आशिर्वच सकलांना ।।१।।

बिल्वपत्र जणू त्रिगुणां । त्रिगुणातीत करावे अंत:करण । कर्पूर ज्योती सम मन उजळूनी जावे गुरुराया ।।२।।

अभिषेकाची शिव गुरूंना आवड । म्हणूनी केले गुणनाम संकीर्तन । सर्वा असू द्यावे नित्य स्मरण । हीच असे प्रार्थना ।।३।।

आपली कृपादृष्टि । असावी सकलांवरी । सकलांची वाढो भक्ति । हेच मागणे मागते ।।४।।

गुरू देव असती अंतरी । याची जाण असावी सतत मनी । त्याची येण्या अनुभूती । यासाठी सतत प्रयत्न करावा ।।५।।

## श्री परमपुज्य दत्त महाराजांच्या अंतरंगात अखंड चालू असलेले गीत

नारायण भजरे माणस ।।धृ।।

त्रिभुवन पतीपद् । जिंकीशी जरी तु ।
काय उणे तुजरे माणस ।।१।।

विषय उपेक्षुनी । अनुभव लक्षूनी ।
आत्मपदी रत रे माणस ।।२।।

कृष्णदयार्णव । कर्णपुटीतव् ।
हेच कथी गुजरे माणस ।।३।।